# वात्सल्य ट्रस्ट, मुंबई

स्थापना-फेब्रुवारी १९८३

नोंदणी क्र. मुंबई E.९१८० / ०८-०२-८३



Orphanage & Adoption Centre



Rehab Centre (for Children with Special Needs)



Computer Training (e-Vidya)



Healthcare (PAP & GDA)



Drive with Pride



Tailoring & Fashion Designing



Beauty & Wellness




Balikashram & Vanprasth-ashram

सरसिजमनुविध्दम् शैवलेनापि रम्यम्

वात्सल्य

# ४० वा वार्षिक अहवाल २०२२-२३



apollo
WORLD CLASS FIRE SOLUTIONS
Apollo Fire Detectors Ltd.
Apollo XP95 Optical Smoke Detector
Apollo Series 65 Optical Smoke Detector
Orbis IS Multisensor Smoke Detector
Auto-Aligning Beam Detector with Laser Alignment
Intelligent Duct Smoke Detector
XP95 IS Ionisation Smoke Detector
Discovery Optical Smoke Detector
Intelligent Reflective Beam Detector
Orbis IS Heat Detector
XP95A Heat Detector
Apollo Sounder Beacon
XP95 IS Heat Detector
Series 65 Heat Detector
Apollo Syncro 1-2 Loop Panel (EN Approved)
Apollo VES eLITE Panel 1 - 4 Loop (UL Listed)
FIRE ALARM & AUDIO SYSTEMS
Authorized Distributors




VATSALYA TRUST, MUMBAI
VATSALYA SKILL TRAINING CENTRE 'UDAAN' - KURLA
N.S.D.C Authorised Training Centre
Skill India
N·S·D·C
National Skill Development Corporation
Transforming the skill landscape
BEAUTY PARLOUR
MEHENDI
TAILORING
G.D.A. COURSE
General Duty Assistant
COMPUTER
TRAINING CENTRE
MOBILE
REPAIRING
TWO
WHEELER
REPAIRING

| Pg. No. | VATSALYA'S PROJECTS AT A GLANCE |
| --- | --- |
| 06 | Orphanage and Adoption |
| 07 | Balikashram (Home for Destitute Girls) |
| 09 | Vruddhashram (Home for Seniors) |
| 10 | Alibag and Badlapur Project |
| 11 | Rehabilitation Centre for Divyang |
| 14 | Skill to Thrive Project<br>1) Patient Assistant Programme<br>2) Beauty and Wellness<br>3) Tailoring and Fashion Designing<br>4) E-Vidya Digital Literacy Programme<br>5) Drive with Pride (DWP) |
| 21 | Kurla Project |


**OUR PARTNERS**

N·S·D·C National Skill Development Corporation
IDRF
sbicap securities
YCMOU
orange Foundation
uti UTI Mutual Fund
protean
SBI Life

| Names of Trustees | विश्वस्तांची नावे |
|---|---|
| 1. Dr. Ainapure Vilas, President | डॉ. ऐनापुरे विलास, अध्यक्ष |
| 2. Shri. Joshi Shrikant, Secretary | श्री. जोशी श्रीकांत, कार्यवाह |
| 3. Shri. Kadhe Janardan, Treasurer | श्री. कढे जनार्दन, कोषाध्यक्ष |
| 4. Smt. Barve Usha | श्रीमती बर्वे उषा |
| 5. Shri. Desai Shrikrishna | श्री. देसाई श्रीकृष्ण |
| 6. Adv. Gaonkar Prasad | ॲड. गांवकर प्रसाद |
| 7. Dr. Pandit Uday | डॉ. पंडित उदय |
| 8. Dr. S. Raman Srinivasa | डॉ. एस.रामन श्रीनिवासा |
| 9. Shri. Saraf Nagnath | श्री. सराफ नागनाथ |
| 10. Shri. Vaidya Ramchandra | श्री. वैद्य रामचंद्र |

| Names of Managing Committee Members | कार्यकारिणी सदस्यांची नावे |
|---|---|
| 1. Smt. Gadre Anjali, Chairperson (till 10.09.2022) | श्रीमती गद्रे अंजली, कार्याध्यक्षा (दि. १०.०९.२०२२ पर्यंत) |
| 2. Shri. Kulkarni Girish, Chairperson (from 10.09.2022) | श्री. कुलकर्णी गिरीश, कार्याध्यक्ष (दि. १०.०९.२०२२ पासून) |
| 3. Shri. Joshi Shrikant, Secretary | श्री. जोशी श्रीकांत,कार्यवाह |
| 4. Shri. Kadhe Janardan, Treasurer | श्री. कढे जनार्दन, कोषाध्यक्ष |
| 5. Shri. Abhyankar Dilip, Member | श्री. अभ्यंकर दिलीप, सदस्य |
| 6. Smt. Agnihotri Aruna, Member | श्रीमती अग्निहोत्री अरुणा, सदस्या |
| 7. Smt. Dhakras Sandhya, Member | श्रीमती धाक्रस संध्या, सदस्या |
| 8. Smt. Joshi Shobha, Member | श्रीमती जोशी शोभा, सदस्या |
| 9. Shri. Sathe Vidyadhar, Member | श्री. साठे विद्याधर, सदस्य |
| 10. Shri. Vaidya Vishwas, Member | श्री. वैद्य विश्वास, सदस्य |


## AUDITORS

**M/s. CVK & Associates (Chartered Accountant)**

Ground Floor, 2 Samarth Apartments, D.S.Babrekar Marg,
Gokhale Road North, Dadar (West), Mumbai 400 028

# दृष्टीक्षेपात वात्सल्य

## VATSALYA AT A GLANCE

| | |
|---|---|
| संस्थेचे नाव<br>Name of Institution | : **वात्सल्य ट्रस्ट, मुंबई**<br>: **VATSALYA TRUST, MUMBAI** |
| सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा नोंदणीक्रमांक<br>Registration No. under Maharashtra: Public Trust Act | : **ई ९१८० / मुंबई ८.२.८३**<br>: **E. 9180 / BOM 8.2.83** |
| आयकर खात्याच्या कलम १२ (अ) खाली नोंदणीक्रमांक<br>Registration No. under Section 12 (A) of Income Tax Act | : **URN - AAATV0345HE20217**<br>**Valid until 31.03.2026** |
| आयकर खात्याच्या कलम ८० (जी) खाली नोंदणीक्रमांक<br>Registration No. under Section 80 (G) of Income Tax Act | : **URN - AAATV0345HF20215**<br>**Valid until 31.03.2026** |
| विदेशातून देणग्या घेण्याबाबत केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाकडून मिळालेल्या प्रमाणपत्राचा नोंदणी क्र. | **: 083780862** |
| PAN NO. | : **AAATV0345H** |

## Addresses, Telephone Nos. and Email ids of our Projects

**KANJURMARG**
Near Kanjurmarg Police Station, Kanjurmarg (East), Mumbai 400 042.
Tel. Nos. 2578 4810 / 8422883150 / 8422883149
Email id : admin@vatsalyatrustmumbai.org

**SANPADA**
Plot No. 11, Sector No.2, Near Oriental College, Sanpada, Navi Mumbai 400 705.
Tel. Nos. 2775 7390 / 2775 3689 / 8422883148/ 8833243141/ 8591046910 (WhatsApp)
Email id : admin.sanpada@vatsalyatrustmumbai.org

**ALIBAG**
House No. 1510-B-2, Behind Mayur Bakery, Alibag, Dist. Raigad 402 201.
Tel. No. 8554884004
Email id : admin.alibag@vatsalyatrustmumbai.org

**BADLAPUR**
Mauje Bhoj, Survey No.12/1, 12/2, 13/1, Badlapur, Dist. Thane

**KURLA**
Bhagini Mandal - Brahmanwadi, Moreshwar Patankar Marg, Kurla (W), Mumbai 400 070.
Tel. No. 7977895175
Email id : admin.kurla@vatsalyatrustmumbai.org

## Names of Banks and Account Nos. for ONLINE DONATION

Account Name : VATSALYA TRUST MUMBAI

1. STATE BANK OF INDIA - Kanjur Marg (Only for Indian Donation)
   Branch Code - 06249
   IFSC Code - SBIN0006249
   Current Account No. - 35562836398
2. STATE BANK OF INDIA - New Delhi (Only for Foreign Donations)
   Branch Code - 00691
   IFSC Code - SBIN0000691
   Swift Code - SBININBB 104
   Account No. - 40137265409
3. INDIAN OVERSEAS BANK - Sanpada Project
   (Only for Indian Donation)
   IFSC Code - IOBA0001502
   Savings Account No. - 150201000001551
4. BANK OF MAHARASHTRA - Alibag Project
   (Only for Indian Donation)
   IFSC Code - MAHB0000229
   Savings Account No. - 20109646941

**भारत सरकारद्वारे FCRA Act च्या सुधारित नियमावलीप्रमाणे संस्थेचा Foreign Account Number वरीलप्रमाणे आहे याची परदेशस्थ देणगीदारांनी कृपया नोंद घ्यावी.**

## नम्र विनंती

या अहवालाद्वारे आपणा सर्व देणगीदार / हितचिंतक यांस कळकळीची विनंती आहे की आपण आपली देणगी शक्यतो धनादेशाद्वारे अथवा ONLINE सेवेद्वारे द्यावी. तसेच देणगीदारांनी देणगी देताना आपला इमेल आय. डी.आणि मोबाईल क्रमांक प्रत्यक्ष किंवा संस्थेच्या इमेलवर जरूर कळवावा. त्यामुळे संस्थेचा वार्षिक अहवाल इमेलद्वारे पाठवणे आम्हाला सोपे जाईल. संस्थेचा इमेल आय. डी. – admin@vatsalyatrustmumbai.org तसेच संस्थेची स्वतंत्र वेबसाईटदेखील आहे vatsalyatrustmumbai.org

'वात्सल्य' च्या नावाचे ओळखपत्र व पावतीपुस्तक नसलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे देणगीची रक्कम किंवा कोणत्याही प्रकारची देणगी देऊ नयेत. संस्थेच्या कार्यकर्त्यांकडे ओळखपत्र व पावतीपुस्तक दिलेलेच असते. कृपया देणगी देताना या सर्व बाबींची खातरजमा करून घ्यावी.

**देणगीचा धनादेश 'वात्सल्य ट्रस्ट, मुंबई' / 'Vatsalya Trust, Mumbai' या नावाने काढावा.**

**ऑन लाईन पेमेंट साठी Website Payment Gateway (SBI Collect) चा वापर करावा.**

# वात्सल्य ट्रस्ट, मुंबईचा दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपणाऱ्या वर्षाचा वार्षिक अहवाल

वात्सल्यच्या सर्व स्वयंसेवक, देणगीदार आणि हितचिंतकांना विनम्र अभिवादन

## विश्वस्त मंडळ आणि व्यवस्थापकीय समिती

वर्षभरात विश्वस्त मंडळात कोणतेही बदल झाले नाहीत.

श्रीमती अंजली गद्रे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने श्री. गिरीश कुलकर्णी यांची व्यवस्थापकीय समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

## संस्थेचे लेखापरीक्षक

२०२२ – २०२३ या आर्थिक वर्षासाठी ट्रस्टचे लेखापरीक्षण आणि कर सल्लागार म्हणून मेसर्स सी.व्हि.के. आणि असोसिएट्स यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## ISO प्रमाणपत्र

ISO 9001:2015 TUV ऑस्ट्रिया द्वारे पुनर्वसन केंद्र, रुग्ण सहाय्यक कार्यक्रम, कांजूर आणि सानपाडा येथील ट्रस्टचे संगणक केंद्र तसेच कांजूर येथील अनाथाश्रम आणि दत्तक केंद्र आणि सानपाडा येथील बालिकाश्रम यांना दिले गेले आहे. या वर्षात दि. २५.११.२०२२ रोजी ISO लेखापरीक्षक श्री. विद्याधर अपशंकर यांनी लेखापरीक्षण केले आणि वरील प्रकल्पांसाठी वात्सल्यचे ISO प्रमाणपत्र चालू ठेवण्यात आले आणि तसेच प्रमाणपत्रामध्ये कांजूर येथील 'ड्राइव्ह विथ प्राइड' प्रकल्पाचा समावेश करण्यात आला.

## वार्षिक तपासणी

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा महिला बाल विकास अधिकारी – मुंबई उपनगरे, बाल कल्याण समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत विविध अधिकाऱ्यांमार्फत वात्सल्यला वेळोवेळी भेट देवून तपासणी करण्यात येते. त्यांनी केलेल्या सुचनांचे पालन करण्यात येते, वात्सल्य मधील स्वच्छता, जेवण व खाद्य पदार्थांचा दर्जा आणि मुलांची घेतली जाणारी काळजी ह्यांचा विशेष उल्लेख आणि सकारात्मक अभिप्राय अधिकाऱ्यांमार्फत दिला गेला.

१. दि. ९/०५/२०२२ रोजी ॲड. श्रीमती सीमा आदाते - सदस्य बाल कल्याण समिती, श्री. विनोद भोसले - जिल्हा संरक्षण अधिकारी, श्रीमती प्राजक्ता देसाई - जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांच्या मार्फत त्रैमासिक तपासणी झाली.

२. दि. १०/०८/२०२२ रोजी जिल्हाधिकारी श्री. अमोल सावंत, श्री. बी. एच. नागरगोजे - जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, श्री. शंकर जाधव - बाल कल्याण समिती अध्यक्ष यांच्यामार्फत त्रैमासिक तपासणी झाली.

३. दि. २०/०८/२०२२ रोजी श्रीमती रश्मी कांबळे - बाल कल्याण समिती सदस्य यांच्यामार्फत तपासणी झाली.

४. दि. १४/११/२०२२ रोजी श्रीमती प्राजक्ता देसाई - बाल संरक्षण अधिकारी, श्री. गणेश चौधरी - बाल कल्याण समिती सदस्य या जिल्हा तपासणी समितीद्वारे तपासणी झाली.

५. दि. २३/११/२०२२ रोजी २०२१-२२ या वर्षाचे मूल्यनिर्धारण करण्यासाठी श्री. बी. एच. नागरगोजे - जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, स्नेहा जोशी - जिल्हा परिविक्षा अधिकारी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील या पथकामार्फत तपासणी झाली.

६. दि. ०९/१२/२०२२ सारा - स्टेट अडॉप्शन रिसोर्स एजन्सीचे श्री. विजय विभाड आणि श्रीमती छाया म्हाकाळे यांच्यामार्फत तपासणी करण्यात आली.

७. दि. २१/०२/२०२३ रोजी श्री. बी एच नागरगोजे - जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री. सुनील शिरस्कर - बाल कल्याण समिती अध्यक्ष आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत त्रैमासिक तपासणी करण्यात आली.

## वार्षिक मेळावा

दि. २८.०१.२०२३ रोजी राजा शिवाजी हायस्कूल, दादरच्या बी.एन. वैद्य सभागृहात वात्सल्यचा वार्षिक मेळाव्याचा सोहळा पार पडला. या सोहळ्यात संस्थेचे दत्तक पालक, देणगीदार आणि हितचिंतक उपस्थित होते. प्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती हर्षदा खानविलकर आणि अभिनेते श्री. सुनील तावडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वात्सल्य संस्थेतील निवासी मुलांच्या सरस्वतीवंदन आणि स्वागतगीताने झाली. प्रमुख पाहुण्यांनी मुलांशी संवाद साधून त्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

कर्मचाऱ्यांच्या विशेष सेवेचे त्यांना 'एम्प्लॉयी ऑफ द इयर' पुरस्कार देऊन कौतुक करण्यात आले. तसेच वात्सल्यचे स्वयंसेवक श्री. सदानंद सामंत, श्री. अवधूत गाडगीळ आणि श्रीमती स्वप्ना राजवाडे यांचाही गौरव करण्यात आला.

त्यानंतर संस्थेचे ISO लेखापरीक्षक श्री. विद्याधर अपशंकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक सुरेल संगीत वाद्यवृंद सादर केला ज्याचा सर्वांनी आणि विशेषतः मुलांनी मनापासून आनंद घेतला.







श्रीमती माधवी मुंढे व श्रीमती नंदा सांगोडे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती सचिता देवरूखकर यांनी आभार मानले.

## प्रशासन

'वात्सल्य ट्रस्ट' चे ११ विश्वस्त आहेत. त्यापैकी ३ कायमस्वरूपी व ८ बदलत्या स्वरुपात आहेत. बदलत्या स्वरूपातील विश्वस्तांची मुदत ६ वर्षे आहे. मात्र दर ३ वर्षांनी ४ विश्वस्त ज्यांचा ६ वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाला आहे ते निवृत्त होतात. विश्वस्तांची बैठक दर ३ महिन्यांनी तर कार्यकारिणी मंडळाची बैठक दर महिन्याला घेतली जाते. त्याखेरीज विश्वस्त वेळोवेळी सभा घेऊन महत्वाच्या विषयांवर चर्चा करतात व निर्णय घेतात. विश्वस्तांच्या बैठकीत महत्वाच्या गोष्टीचं निवेदन केलं जातं व आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेतले जातात. सभेच्या इतिवृत्तांची नोंद ठेवली जाते. संस्थेच्या ध्येयधोरणांनुसार संस्थेच्या कामाची दिशा संस्थेच्या विश्वस्तांकडून ठरवली जाते. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्य संस्थेच्या दैनंदिन कामकाजाचं आयोजन करतात व त्यावर देखरेख करतात.

'वात्सल्य' चे विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य कुठल्याही प्रकारचे मानधन घेत नाहीत. आजपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचा अथवा सदस्याचा परदेश दौ-याचा खर्च संस्थेने केलेला नाही.

आस्थापनावरील खर्च

| **कर्मचारी** | **महिला** | **पुरुष** | **एकूण** |
|---|---|---|---|
| दरमहा रु. १०,०००/- पर्यंत | ९० | १० | १०० |
| दरमहा रु. १०,००१/- ते रु. २५,०००/- पर्यंत | ६५ | ६ | ७१ |
| दरमहा रु. २५,००१/- ते रु. ३०,०००/- पर्यंत | १० | ३ | १३ |
| दरमहा रु. ३०,००१/- पेक्षा जास्त | १ | - | १ |
| एकूण | **१६६** | **१९** | **१८५** |

## अनाथालय -

### बालसंगोपन आणि पुन:र्वसन केंद्र :

वात्सल्यचे बालसंगोपन आणि पुन:र्वसन केंद्र दिनांक ०२/०६/१९८५ रोजी कांजूर येथे सुरू करण्यात आले. अनाथ मुलांचे विशेषतः अर्भकांचे संगोपन करून त्यांना चांगल्या कुटुंबात दत्तक देवून त्यांचे पुन:र्वसन करण्याचे कार्य येथे करण्यात येते.





अनाथ मुलांना वात्सल्य, काळजी, संरक्षण आणि कौटुंबिक वातावरणाची आवश्यकता असते. त्यासाठी एखाद्या कुटुंबात असे मूल दत्तक दिल्यानेच त्याचे योग्यप्रकारे पुन:र्वसन होवू शकते हे ओळखून वात्सल्यचे बालसंगोपन आणि पुन:र्वसन केंद्र सुरू करण्यात आले. सदर केंद्रात अर्भकांची आणि लहान बाळांची योग्यप्रकारे प्रेमाने काळजी घेवून चांगल्या कुटुंबात कायदेशीरमार्गे दत्तक देवून त्यांचे पुन:र्वसन करण्याचे काम गेली सुमारे चाळीस वर्षे वात्सल्यतर्फे करण्यात येते. आतापर्यंत १३५० हून अधिक बालकांचे वात्सल्यच्या कांजूरमार्ग व अलिबाग येथील प्रकल्पामधून दत्तक प्रक्रियेमार्फत पुन:र्वसन करण्यात आले आहे.

यावर्षी एकूण ४५ बालकांना वात्सल्यमध्ये प्रवेश देण्यात आला आणि एकूण २८ मुले दत्तक देण्यात आली. सध्या कांजूर येथील प्रकल्पात ४३ मुले आहेत. प्रसूतीपूर्व काळजी व संगोपनासाठी महिला न्यायालयीन आदेशाद्वारे वात्सल्यमध्ये काही कालावधीसाठी दाखल करण्यात येतात. संगणकीय प्रशिक्षण, शिवणकाम, फॅशन डिझायनिंग वगैरे व्यावसायिक प्रशिक्षण देवून सदर महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास वात्सल्यतर्फे सहाय्य करण्यात येते. अगदी थोड्या कालावधीसाठी संगोपन व काळजीसाठी दाखल करण्यात येणाऱ्या बालकांनाही शालेय शिक्षण देण्यात येते, ज्यायोगे कौटुंबिक कारणामुळे अशा मुलांचे शिक्षण अडून राहत नाही. अशा मुलांच्या मानसिक आरोग्याची विशेष काळजी वात्सल्यमध्ये घेतली जाते.

दत्तक प्रक्रियेची वाढती गरज लक्षात घेवून रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे वात्सल्यची शाखा २०१० साली सुरू करण्यात आली. अलीकडेच ह्या शाखेतून शंभरावे बाळ दत्तक देण्यात आले. अलिबाग शाखेत अहवाल साली १६ मुले दाखल करण्यात आली व ८ मुले दत्तक देण्यात आली. सध्या वात्सल्य अलिबाग येथे १२ मुले आहेत.

**बालिकाश्रम :**

वात्सल्यचा बलिकाश्रम सानपाडा येथे २००० साली सुरू करण्यात आला. वय वर्षे ६ ते १८ या वयोगटातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुली बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार बलिकाश्रमात दाखल करण्यात येतात. सर्व मुलींच्या राहण्याची व शिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यात येते. मुलींच्या आरोग्य व वैद्यकीय गरजांकडे विशेष लक्ष दिले जाते. सध्या बलिकाश्रमात १८ वर्षाखालील ४७ मुली राहिवासास आहेत. तसेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या १२ मुली शिक्षणासाठी रहात आहेत. त्याचप्रमाणे तातडीच्या संरक्षणासाठी व तात्पुरत्या निवाऱ्यासाठी १८ वर्षांखालील मुली पोलिसांच्या व बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार बलिकाश्रमात दाखल करण्यात येतात. ह्या मुली विशेषतः रात्रीच्या निवाऱ्यासाठी दाखल केल्या जातात. पण काही वेळा सात दिवसांपर्यंतही त्यांचे वात्सल्यमध्ये वास्तव्य असते. अहवाल साली अशा २८ मुलींना वात्सल्यमध्ये निवारा देण्यात आला. सर्व मुलींचे शास्त्रीय पद्धतीने समुपदेशन करण्यात येते. संस्थेच्या जवळच असलेल्या विवेकानंद संकुलमध्ये सर्व मुली शालेय शिक्षण घेतात. तसेच शालांत परीक्षेनंतर मुलींनी महाविद्यालयीन शिक्षण घ्यावे यासाठी उत्तेजन देण्यात येते. मुलींच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष देण्यासाठी संस्थेने शिक्षिकाही नेमल्या आहेत. त्यामुळे मुलींची शैक्षणिक प्रगती उत्तम आहे.



ह्या वर्षी सात मुली दहावीच्या म्हणजेच शालांत परीक्षेत उत्तीर्ण झाल्या व त्या कनिष्ठ महाविद्यालयात पुढील शिक्षण घेत आहेत. तसेच दोन मुली बारावीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाल्या व BMS पदवी अभ्यासक्रमासाठी त्यांनी प्रवेश घेतला आहे.

कु. जना सोलंके हीने मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त केली आणि तीने विधी महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे.

बालिकाश्रमातील कु. पूजा राऊथ हिची यूनायटेड किंगडम येथील यूनिवर्सिटी ऑफ बरमिंग्याहम या विद्यापीठात MSc in Food Safety and Hygiene Management ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. वात्सल्यने तिचा शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी केलेल्या आर्थिक मदतीच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. कु. पूजाचे हे यश बालिकाश्रमातील इतर होतकरू मुलींसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरले आहे.

कु. पूजा शिंदे हीने पदवीपर्यन्तचे शिक्षण पूर्ण करून Masters in Management Studies (MMS) ह्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे.



मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सुलभ व्हावे ह्या करता विविध व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमही त्यांना शिकविले जातात. ब्युटिशीयन, नर्सिंग आणि केटरींगचे प्रशिक्षण ४ मुली घेत आहेत. यावर्षी १८ वर्षे पूर्ण झालेल्या पाच मुलींना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी सर्वतोपरी सहाय्य वात्सल्यतर्फे देण्यात येत आहे.

वात्सल्यच्या मुली नेहमीच क्रीडा स्पर्धांमध्ये चमक दाखवितात. महिला आणि बाल विकास विभागातर्फे डिसेंबर २०२२ मध्ये आयोजलेल्या क्रिडा स्पर्धामध्ये ४१ पदके व चषक बालिकाश्रमातील मुलींनी मिळविले.

बालिकाश्रमात राहणाऱ्या मुलींच्या मानसिक आरोग्यावर विशेष लक्ष्य दिले जाते आणि नियमित समुपदेशन केले जाते. विविध थेरेपीद्वारे मुलींना भावनिक संतुलन ठेवून आणि वर्तणूकीच्या समस्यांना तोंड देवून अधिकाधिक सुधारणा करण्यास उत्तेजन दिले जाते.

राष्ट्रीय भावना तेवत राहून उत्तम व जबाबदार नागरिक निर्माण व्हावे ह्यासाठी स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, गांधी जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती इ. उत्साहात साजरी करण्यात येतात.

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, ख्रिसमस, नववर्ष दिन, होळी, गुढीपाडवा इत्यादि सण तसेच प्रत्येक मुलीचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

बालिकाश्रमातील मुलींसाठी 'यु अँड आय फाऊंडेशन' तर्फे दर शनिवार – रविवारी गणित, संभाषण कौशल्य आणि चांगल्या वर्तणूकीचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. 'फ्लाय हायर' च्या कार्यकर्त्यांनीही वर्षभरात वेळोवेळी मुलींसाठी कार्यशाळा घेतल्या.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलींनी योग, डिजिटल साक्षरता, स्वसंरक्षण इ. चे प्रशिक्षण घेतले.

अरणाळा सागरकिनाऱ्यावर मुलींनी सहलीचा आनंद घेतला. आयपीएल च्या 'पंजाब किंग' क्रिकेट संघाचे सहमालक श्री. नेस वाडिया यांच्या व्यक्तिगत सहभागाने आणि त्यांच्या 'नम्योहो दान' ह्या सेवाभावी संस्थेतर्फे सर्व मुलींना आयपीएल चे दोन क्रिकेट सामने डी. वाय. पाटील स्टेडियम व वानखेडे स्टेडियम वर पाहण्याची संधि मिळाली.

श्री. नेस वाडिया यांनी त्यांचा वाढदिवस सेंट कॅथरीन सिएना स्कूल अँड ऑरफनेज, वांद्रे येथे बलिकाश्रमातील मुलींबरोबर साजरा केला.

'नम्योहो दान' ह्या सेवाभावी संस्थेतर्फे वर्षभर आठवड्यातून दोन दिवस योगविद्येचे वर्ग घेतले वात्सल्य मध्ये घेतले जातात. दिनांक १७.१२.२०२२ रोजी श्री. नेस वाडिया यांनी सानपाडा प्रकल्पाला भेट दिली आणि हवन केले.

## वृद्धाश्रम :

सानपाडा येथील प्रकल्पात वृद्ध स्त्रियांसाठी वृद्धाश्रमही चालविला जातो. निराधार किंवा घर नसलेल्या वृद्ध महिला वात्सल्यच्या वृद्धाश्रमात राहतात आणि तिथे त्यांची योग्य काळजी घेतली जाते. त्यांच्या विरंगुळ्यासाठी दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, वाचनालय यांची सोय आहे. संस्थेतील श्री गणेश मंदिरामुळे वातावरण अधिक प्रसन्न राहण्यास मदत होते. वृद्धांचे नियमित समुपदेशन केले जाते आणि त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहावे याचे प्रयत्न केले जातात.



## अलिबाग प्रकल्प :

अलिबाग प्रकल्पात दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी सत्यनारायण पूजा वात्सल्यचे देणगीदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत केली गेली.



डॉ. श्री. धामापूरकर, डॉ. श्री. आदित्य चेवले, डॉ. श्री. परवेझ शेख अँड डॉ. श्री. सौरभ पाटील हे प्रकल्पातील बालकांच्या आरोग्याची काळजी घेतात.

अलिबाग प्रकल्पाच्या प्रमुख श्रीमती शोभा जोशी यांची स्टेट ॲडोपशन रीसोर्स एजन्सि (SARA) वर सदस्य म्हणून राज्य सरकार तर्फे नियुक्ती करण्यात आली.

श्रीमती मुग्धा वैशंपायन यांच्या उपस्थितीत 'दि नेक्टर फेस्टिवल ऑफ फ्रीडम' साजरा करण्यात आला.

## बदलापूर प्रकल्प :

अहवाल साली वात्सल्यच्या बदलापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा लाभ भोज, बदलापूर नजिकच्या पाड्यांमध्ये राहणाऱ्या शेतकरी व आदिवासी बांधवांना होत आहे. दहिवली, जूवेली, कोंडेश्वर, बेंडशील, चामटोळी, वराडा, धामणगाव येथील शेतकरी व आदिवासी राहिवाश्यावर वैदयकीय उपचार करण्यात आले. एकझेमा, फंगल इन्फेक्शन, खरूज वगैरे चर्मरोग, ताप, अतिसार, संधिवात हे आजार आणि कुपोषण हे ह्यांचे प्रमाण गरीबीमुळे व राहणीमानामुळे ह्या भागात जास्त आहे. शेतातील व इतरत्र होणाऱ्या प्रचंड अंगमेहनतीमुळे संधिवातही बऱ्याच लोकांमध्ये आढळून येतो.

अहवाल सालात ११०६ रुग्णांना मोफत वैदयकीय उपचार व औषधे देण्यात आली, ह्यात ७८४ महिलांचा व ३१२ पुरुषांचा समावेश आहे.

दिनांक २६. ०२. २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय शिबिराचा लाभ १०३ रुग्णानी घेतला.



## ø डोळ्यांची तपासणी :





श्रीमती इंदिराबाई वावीकर चॅरिटेबल ट्रस्ट, ठाणे यांच्या सहकार्याने डोळे तपासणीचे शिबीरही आयोजण्यात आले आणि फक्त शंभर रुपयांत ५० चष्म्याचे वाटप करण्यात आले.

## ø दंतचिकित्सा :



सुमारे ५० रुग्णांची दंतचिकित्सा करण्यात आली. अधिक उपचाराची गरज असलेल्या रुग्णांना बदलापूर येथील नजीकच्या रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले.

## दिव्यांग मुलांसाठीचे पुन:र्वसन केंद्र :

पुनर्वसन केंद्रात विशेष गरज असेलेल्या मुलांना, ज्यांच्या नियमित वाढीत कमतरता दिसून येते, अशांना आणि त्यांच्या पालकाना केंद्रातील पुनर्वसन व्यावसायिकांकडून मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येते. वात्सल्यच्या पुनर्वसन केंद्रात विशेष शिक्षण, ओक्यूपेशन थेरपी, फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, समुपदेशन, सामूहिक थेरपी आणि व्यवसाय मार्गदर्शन दिले जाते.



सध्या वात्सल्यच्या कांजूर, अलिबाग, सानपाडा येथील केंद्रांमध्ये सेरेब्रल पालसी, ओटीझम, गतीमंदता, ADHD, एंजेल मॅन सिनड्रॉम, डाऊनस् सिनड्रॉम, मतीमंदता, हेमीप्लेगिया, ग्लोबल डेव्हेलपमेंटल डीले अशा समस्यांचा सामना

करणाऱ्या सुमारे २०० मुलांना उपचार व मार्गदर्शन देण्यात येते.



पुनर्वसन केंद्राच्या कामामध्ये मुख्यत: चार विभागांचा समावेश होतो.

१. आकार – ह्या केंद्रात फिजिओ थेरपी, स्पीच आणि ऑक्यूपेशनल थेरपी यांसारख्या उपचार पद्धतींचा वापर केला जातो. यामुळे मुलांच्या मानसिक दुर्बलता, भाषा आणि उच्चार यांसारख्या समस्यांवर इलाज होऊ शकतो.

२. ख़ुशी - बालक आणि पालक मार्गदर्शन केंद्र – ह्या केंद्रात मुलांच्या वागणूक, भावनात्मक, शैक्षणिक अशा विविध समस्या यांवर उपचार केले जातात. यासाठी मानसोपचार, कौटुंबिक उपचार, मुलांवर उपचार, पालकांचा कौशल्य विकास आणि शिक्षकांची संवेदनशीलता आदींवर विशेष लक्ष पुरविले जाते.



३. दिशा – यामध्ये पुनर्वसनासाठी लागणारी साहित्य आणि मदत विशेष गरजा असणा- या मुलांना वात्सल्यतर्फे पुरवली जातात. इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातूनही वात्सल्य तर्फे हे कार्य सुरू आहे. यावर्षी २५० हून अधिक मुलांना पुनर्वसन साहित्य व साधनांचे वाटप करण्यात आले. विविध स्वयंसेवी संस्था, पुनर्वसन व्यावसायिक यांच्या माध्यमातून विविध ठिकाणच्या जास्तीत जास्त गरजू मुलांना लाभ देण्याचा प्रयत्न केला जातो.



४. व्यवसाय आणि पूर्व व्यवसाय मार्गदर्शन - विशेष गरजा असणा- या मुलांना व्यवसाय मार्गदर्शना द्वारे उत्पन्नाचे साधन निर्माण करून स्वत: च्या पायावर उभे राहण्यास दिशा दाखविण्याचे प्रयत्न करण्यात येतात. दि. २१.१०.२०२१ रोजी कुर्ला येथील केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

विशेष गरजा असणा- या मुलांच्या विकासासाठी असलेले सर्व कार्यक्रम पुनर्वसन केंद्रामार्फत समग्र दृष्टीकोनातून राबवले जातात.

वात्सल्यची पुनर्वसन केंद्रे कांजूर (मुंबई), सानपाडा (नवी मुंबई) आणि अलिबाग (रायगड जिल्हा) ह्या तीन ठिकाणी चालवण्यात येतात. जवळजवळ २०० दिव्यांग मुले ह्या केंद्रांचा नियमित लाभ घेतात. तसेच दिशा ह्या आऊटरिच कार्यक्रमाअंतर्गत ३०० हून अधिक दिव्यांग मुलांना पुनर्वसनसाधने देण्यात आली. उपचार पद्धतीत सातत्य राहण्यासाठी मुलांच्या पालकांना प्रशिक्षण दिले जाते ज्यायोगे घरीही थेरपी देवून मुलांना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला जातो.

## पुनर्वसन केंद्र कांजूर :

कांजूर येथील वात्सल्यचे पुनर्वसन केंद्र २००४ साली सुरू करण्यात आले. सदर केंद्राला 'अपंग आयुक्तालय (पुणे), महाराष्ट्र राज्य यांचा 'पर्सन्स विथ डिसॲबिलिटी ॲक्ट , १९९५ अंतर्गत परवाना आहे. आता पर्यन्त २६०० मुलांनी सादर केंद्राचा लाभ घेतला. दर आठवड्याला सुमारे १३० मुले सादर केंद्रात नियमित येतात.

वर्षभरात मुलांसाठी आणि पालकांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. मुलांनी आषाढी एकादशी, रक्षा बंधन, स्वातंत्र्य दिन , गोकुळाष्टमी, गणेश चतुर्थी, नवरात्रि, दिवाळी, बालदिन, होळी इत्यादि सण मुलांनी उत्साहात साजरे केले. तीन दिवसांच्या उन्हाळी शिबिरामध्ये मुलांबरोबर पालकांनीही भाग घेतला. तसेच क्रीडामहोत्सवाचेही आयोजन करण्यात आले. ऑक्यूपेशन थेरपी, स्पीच थेरपी आणि फिझियो थेरपी चा लाभ ३८ मुलांनी घेतला. डॉ. मनीषा मेश्राम (फिझियो थेरपी), डॉ. ऋषिकेश देशमुख (स्पीच थेरपी). डॉ. मेघना शेठ (ऑक्यूपेशन थेरपी) आणि श्रीमती आदिती गोखले ह्यानी मुलांना थेरपी देवून मुलांमध्ये सुधारणा घडवून आणल्या.

## दिशा आऊटरिच केंद्र :

वात्सल्यच्या दिशा आऊटरिच केंद्रामार्फत इतर सेवाभावी संस्थांबरोबर सहकार्य करून जास्तीत जास्त मुलांना थेरपीचा लाभ दिला जातो तसेच पुनर्वसनसाधनेही दिली जातात.

अहवाल साली (१) संवेदना – लातूर, (२) AWMH, (३) अविष्कार स्पेशल स्कूल, रत्नागिरी, (४) भारत विकास परिषद, पुणे, (५) सोबती सेंटर, वाडा इत्यादि संस्थांच्या सहकार्याने ७ ओरथोसिसची शिबिरे घेण्यात आली.

(1) दि. २२.०५.२०२२ रोजी पुणे येथे ओरथोसिस शिबिर घेण्यात आले. तीन मुलांची तपासणी करून भारत विकास परिषद येथे साचे तयार करण्यात आले आणि दि. १९.०६.२०२२ रोजी पुनर्वसनसाधनांचे वाटप करण्यात आले. डॉ. अंकित, डॉ. मेघा, डॉ. हिरल आणि श्री. संदेश यांनी तपासणी करून मुलांना आणि पालकांना प्रशिक्षणही दिले.

(2) दि. ३०.०६.२०२२ आणि ०१.०७.२०२२ रोजी लातूर येथे श्रवणयंत्र आणि पुनर्वसनसाधने यांचे वाटप करण्यात आले.







(3) दि. १७.०८.२०२२ आणि २३.०९.२०२२ रोजी अविष्कार स्पेशल स्कूल, रत्नागिरी, येथे आयोजित केलेल्या शिबिरात ४१ मुलांना ऑक्यूपेशनल थेरपीसाठी तपासण्यात आले तर ४९ मुलांना स्पीच थेरपीसाठी तपासण्यात आले. तसेच पालकांना आणि अविष्कार स्पेशल स्कूलच्या कर्मचारी वर्गाला उपचार पद्धती समजाविण्यात आली. ओटीस्ट डॉ. हिरल आणि डॉ. मेघा आणि स्पीच थेरापिस्ट श्रीमती गायत्री यांनी दूर आणि दुर्दम्य ठिकाणी राहणाऱ्या मुलांवर उपचार करण्यासाठी अतिशय मेहनत घेतली.

(4) दि. २१.१२.२०२२ रोजी अलिबाग येथे ३४ मुलांना तपासण्यात आले व साचे करण्यात आले आणि दि. २४.०२.२०२३ रोजी आरंभ स्पीच अँड हियरिंग क्लिनिक यांच्या सहाय्याने श्रवणतंत्रज्ञ डॉ. ऋषिकेश, श्रीमती आदिती आणि अलिबाग केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शिबिराचे आयोजन करण्यात आले.

(5) दि. ११.०३.२०२३ रोजी कांजूर येथे १९ मुलांना तपासण्यात आले व त्यांना पुनर्वसनसाधनेही देण्यात आली. त्यापैकी AWMH येथील १२ मुले तर पुनर्वसन केंद्रात नियमित उपचार घेणारी ५ मुले सामील होती.

(6) दि. २०.०२.२०२३ रोजी दिशा कार्यक्रमा अंतर्गत सोबती सेंटर, वाडा येथे १२ मुलांना तपासण्यात आले आणि त्यांना उपचार कार्यक्रम आणि वेळापत्रक देण्यात आले.

(7) दि. २४.०३.२०२३ आणि ३०.०३.२०२३ आरंभ स्पीच अँड हियरिंग क्लिनिक यांच्या सहकार्याने तपासणी व साचे करून २५ मुलांना श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. सदर शिबिरात पुनर्वसन केंद्राच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मोठे योगदान दिले.

## कौशल्य विकास योजना -

### 1. पेशन्ट असिस्टंट प्रोग्रॅम (PAP) – रुग्णसहाय्यक अभ्यासक्रम :

**समस्येची उत्पत्ती -**

मुलींच्या शिक्षणाची समस्या अद्यापही देशाला भेडसावत आहे. 'बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोगाच्या' २०१९ च्या अहवाला नुसार १५ ते १८ वर्षे वयोगटातील ४० टक्के बालिकांना शाळा सोडणे भाग पडते आणि त्यापैकी अर्ध्याहून अधिक मुली घरकाम करतात व घराची जवाबदारी घेतात.

**अभ्यासक्रमाची ओळख –**

शिक्षण, विशेषतः कौशल्य विकासाचे व्यावसायिक शिक्षणक्रम हे शाळा सोडाव्या लागलेल्या मुलींसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात.

कुटुंबातील कठीण आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागलेल्या किंवा १० वी / १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या मुलींसाठी २००६ पासून वात्सल्य ट्रस्ट ने हा रुग्णसहाय्यक शिक्षणक्रम (YCMOU मान्यताप्राप्त) हा कोर्स सुरु केला. सदर एक वर्षाच्या अभ्यासक्रमात वर्गातील शिक्षणाबरोबर रुग्णालयामध्ये चार महिन्याचे प्रशिक्षणही दिले जाते. इंद्रावती हॉस्पिटल, एरोळी आणि अश्विनी हॉस्पिटल, घाटकोपर येथे मुलींनी प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेतले.

सदर अभ्यासक्रम मुंबई, नवी मुंबई, नेरळ, लातूर, दापोली आणि पालघर जिल्ह्यात येथे राबविण्यात आला. वरील केंद्रामधून दरवर्षी सुमारे २५० मुली प्रशिक्षण घेत आहेत.

आतापर्यन्त सुमारे १५०० मुलींनी हे प्रशिक्षण पूर्ण करून आज चांगल्या हॉस्पिटल मध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत.

**भविष्यातील गरज –**

आरोग्य सेवा क्षेत्राला मोठया प्रमाणात वैद्यकीय निदान करणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची गरज असते. घरातील रुग्णांची सेवा, वृद्धांची सेवा, तसेच खेडेगावांत व आदिवासी भागात मूलभूत आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची गरज ध्यानात घेऊन वात्सल्यने कुर्ला व डेरवण येथे सहा महिन्याचा 'जनरल ड्यूटि असिस्टेंट' (GDA) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. सदर अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर NSDC म्हणजेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळचे प्रमाणपत्र देण्यात येते. सदर क्षेत्राला पूरक ठरावे म्हणून रुग्ण सहाय्यक कर्मचारी, आशा कर्मचारी, घरातील रुग्णांची सेवा, वृद्धांची सेवा यांसाठी आवश्यक ते प्रशिक्षण वर्ग महाराष्ट्रात विविध ठिकाणी स्थानिक सेवाभावी संस्थांच्या सहाय्याने सुरू करण्याचा मानस आहे. वरील प्रशिक्षणामुळे मुली आणि स्त्रिया आत्मविश्वासाने स्वतःच्या पायावर उभे राहतात.



## 2. सौंदर्य प्रसाधन प्रशिक्षण केंद्र

ऑगस्ट २०२१ पासून वात्सल्यने विशेषतः उपेक्षित महिलांसाठी सौंदर्य प्रसाधन प्रशिक्षण केंद्र सुरू केले ज्या मार्फत त्यांना रोजगार उपलब्ध होवू शकतो.

महिलांना आणि तरुणांना रोजगाराच्या विविध दिशा उपलब्ध करून देण्याच्या वात्सल्यच्या प्रयत्नात सौंदर्य प्रसाधन प्रशिक्षणाला विशेष मागणी असल्याचे आढळून आले.

**प्रशिक्षणाची वैशिष्टे –**

NSDC म्हणजेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळचे प्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या कुर्ला व उल्हासनगर येथे चालणाऱ्या ह्या प्रशिक्षण वर्गात पेडिक्युर, मॅनिक्युर, केसांची आणि त्वचेची निगा राखण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात येते. स्वयंसिद्ध महिला मंडळ- लातूर, सेवालय हासेगाव- लातूर, डेरवण, SPMESM-संभाजीनगर आणि जालना येथे ह्या वर्षी उपकेंद्रे सुरु करून प्रशिक्षण कार्याचा विस्तार केला गेला. अत्यंत गरीब वर्गातील महिला, तृतीयपंथी व्यक्ति, शरीर विक्रय कराव्या लागणाऱ्या भगिनी, कारागृहात बंदिस्त असणाऱ्या व्यक्ति

इत्यादींनाही प्रशिक्षणाद्वारे उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. श्रीमती सविता पेठे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनाही प्रशिक्षित करण्यात येते ज्यायोगे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील नवीन कार्यप्रणालीचा अभ्यास करता येतो. विद्यार्थ्यांना संगणक वापर, MS-Office, ईमेल चा वापर, व्यवसायिकता आणि आर्थिक उलाढाल, संभाषण कौशल्य इत्यादि मूलभूत गोष्टीही शिकविण्यात येतात. अशा तऱ्हेने पारंपारिक शिक्षणाबरोबरच व्यवसायभिमुख शिक्षण देवून सक्षमिकरणाचा प्रयत्न केला जातो.

प्रशिक्षणानंतर वात्सल्याचे विद्यार्थी खाजगी कंपन्यामध्ये नोकरी करतात किंवा स्वयंरोजगार मिळवितात. यावर्षी सुमारे १५० विद्यार्थी प्रशिक्षित करण्याचे आयोजले होते परंतु केंद्राला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला आणि ३७७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले.

या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ञ श्रीमती सविता पेठे, मुंबई आणि श्रीमती रोहिणी पांडे, औरंगाबाद यांचे विशेष आभार.



## 3. शिवणकाम आणि फॅशन डिझाइनिंग :

ऑगस्ट २०२१ पासून वात्सल्यने उपेक्षित महिलांसाठी शिवणकाम आणि फॅशन डिझाइनिंग प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रातूनही NSDC म्हणजेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळचे प्रमाणीत अभ्यासक्रम कुर्ला, उल्हासनगर, हासेगाव- लातूर, जालना, संभाजी नगर, राजापूर – रत्नागिरी येथे चालविण्यात येतात. सुरवातीला ३०० लाभार्थीची अपेक्षा असताना ४५८ जणानी प्रशिक्षण घेतले व ते अर्थाजन करू लागले. दि. ०३.१२.२०२२ रोजी कुर्ला येथील विद्यार्थिनींनी यशस्वीरित्या 'फॅशन शो' आयोजित केला. सदर क्षेत्रातील उपस्थित आठ मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्य आणि कलागुणांचे कौतुक केले.

कारागृहातील २५ कैद्यांना प्रशिक्षण देवून त्यांना त्यांच्या कैदेचा कालावधी पूर्ण झाल्यावर समाजात मानाने रोजगार मिळवून जगण्याची संधि उपलब्ध करून दिली.

नोव्हेंबर २०२२ मध्ये ३५० हून अधिक रुग्ण सहाय्यकांचे गणवेश विद्यार्थिनींनी शिवून दिले.

भगिनी मंडळ, कुर्ला यांच्या इमारतीत जून २०२१ पासून 'उडान प्रकल्प' कुर्ला येथे सुरू करण्यात आला. सदरचे केंद्र हे कौशल्य विकास प्रशिक्षणाला वाहिलेले आहे.

संगणक प्रशिक्षण, सौंदर्य प्रसाधन प्रशिक्षण, शिवणकाम आणि फॅशन डिझाइनिंग प्रशिक्षण, मोबाईल फोन

दुरुस्ती अशा व्यवसायाभिमुख प्रशिक्षणाचा लाभ २६७ विद्यार्थिनींनी घेतला. पुढील वर्षी ही संख्या ५०० पेक्षा जास्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ०३.१२.२०२२ रोजी विद्यार्थिनींनी आयोजित केलेल्या 'फॅशन शो' च्या कार्यक्रमाला माननीय श्री. अश्रफ आझमी, नगरसेवक, कुर्ला (पश्चिम विभाग), पोलिस निरीक्षक श्री. मारुती पाटील, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या समन्वयक श्रीमती सुवर्णा सोनावणे, कोटक एड्युकेशन फाउंडेशनच्या समन्वयक श्रीमती प्रतिभा कांबळे, फॅशन डिझाइनर श्रीमती नम्रता कोकणे आणि श्रीमती सौम्या कुलकर्णी यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींचे  कौतुक केले.





आंतरराष्ट्रीय महिला दिवस कुर्ला प्रकल्पात दि. १०.०३.२०२३ रोजी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाला माननीय श्री. अश्रफ आझमी, नगरसेवक, कुर्ला (पश्चिम विभाग), कुर्ला पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक श्रीमती वर्षा भगत, श्रीमती नूतन पाटील, श्रीमती कुंजले उपस्थित होते. प्रकल्पातील विद्यार्थिनींनी नाटक व करमणुकीचे कार्यक्रम सादर केले. श्रीमती राजश्री दामले यांनी विद्यार्थिनींनी मार्गदर्शन केले.

## 4. इ-विद्या प्रकल्प :



छोट्या शहरात आणि खेडेगावांत संगणक साक्षरतेचा प्रसार करण्याचे कार्य सदर प्रकल्पातर्फे करण्यात येते.

कांजूर, सानपाडा, कुर्ला येथे संगणक प्रशिक्षण वर्ग चालू होतेच. महाराष्ट्र आणि गोवा राज्यांत एकूण ४६ ठिकाणी इ-विद्याकेंद्र तेथील स्थानिक समाजसेवी संघटनांच्या आणि शिक्षणसंस्थांच्या मदतीने सुरू करण्यात आली आहेत. यावर्षी ह्या केंद्रामधून १८७२ विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख संगणकीय प्रशिक्षण घेतले. वात्सल्यची प्रशिक्षण केंद्रे ही MKCL शी नोंदणीकृत असून MSCIT आणि KLIC प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. NIIT फाऊंडेशनच्या सहाय्यानेही संगणक प्रशिक्षण

वर्ग घेतले जातात आणि NSDC अंतर्गत प्रशिक्षण वर्ग लवकरच सुरू करण्यात येतील.



NIIT फाऊंडेशनच्या सहाय्याने सिनटेल कंपनीच्या प्रयोजकतेखाली २८८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यापैकी ७० विद्यार्थ्यांना सिनटेल कंपनीने मध्येच रोजगार देण्यात आला.

तसेच NIIT फाऊंडेशनच्या सहाय्याने एंजेल ब्रोकिंग कंपनीच्या प्रयोजकतेखाली ३० विद्यार्थ्यांना डिजिटल मार्केटिंग, BFSI आणि लॉजिस्टिक्सचे प्रशिक्षण देण्यात आले.

विद्यार्थ्यांची संभाषणकला वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीनेही त्यांना प्रशिक्षण देण्यात आले ज्यायोगे नोकरीच्या मुलाखतीला ते आत्मविश्वासाने तोंड देवू शकतील. येत्या वर्षी ५० संस्थांशी सहकार्य करून खेडोपाड्यात संगणक प्रशिक्षणाचे कार्य पोहोचवून समाजातील कमजोर घटकातील विद्यार्थ्यांची संख्या ३००० पर्यन्त नेण्याचा मानस आहे.

